वर्ष : ०५ | अंक: २६ | मुंबई, मंगळवार २१ मे २०१९ ते २७ मे २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग लवकरच

3 → जातींमध्ये तरुणांची घुसमट

केंद्रात पुन्हा आमचेच बहुमतातील सरकार ← 4

## एक्सिट पोलनं सांगितला देशाचा मूड

# देशात मोदी लाट कायम?

**देशात पुन्हा एकदा मोदी सरकारच सत्तेवर येणार, असा अंदाज एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. तर राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या जागा २०१४ पेक्षा वाढतील, असा अंदाज वर्तवण्यात आला असला तरी पंतप्रधानपदावर विराजमान होण्याचे त्यांचे स्वप्न यंदा तरी पूर्ण होणार नाही, असे एक्झिट पोलमध्ये दिसते.**



लोकसभा निवडणूक २०१९ मधील सातव्या टप्प्यातील मतदान प्रक्रियाही पार पडली आहे. लोकसभा निवडणुकीतील सर्व उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. मतदानानंतर आता निकाल कोणाच्या बाजूनं लागणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. लोकसभा निवडणूक २०१९ मध्ये कोणता पक्ष सत्तेच्या खुर्चीत विराजमान होणार? याचे निकाल २३ मे रोजी स्पष्ट होतील. पण जनतेला आपला कौल कोणत्या पक्षाच्या बाजूनं दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींची जादू पुन्हा चालणार का? वंचित बहुजन आघाडी परिणामकारक ठरणार का? याचे अंदाज आता एक्झिट पोलद्वारे समोर आले आहेत.

देशात पुन्हा एकदा मोदी सरकारच सत्तेवर येणार, असा अंदाज एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. तर राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या जागा २०१४ पेक्षा वाढतील, असा अंदाज वर्तवण्यात आला असला तरी पंतप्रधानपदावर विराजमान होण्याचे त्यांचे स्वप्न यंदा तरी पूर्ण होणार नाही, असे एक्झिट पोलमध्ये दिसते.


नरेंद्र मोदींची पुन्हा सत्ता येणार का, भाजपा बहुमताचा आकडा गाठणार का, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस कशी कामगिरी करणार, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यात काय होणार, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष या महाआघाडीला जनता पाठिंबा देणार का, अशा असंख्य प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न या एक्झिट पोलमध्ये करण्यात आला.

उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष या महाआघाडीने भाजपासमोर चांगले आव्हान निर्माण केल्याचे दिसते. तर गुजरात, दिल्ली या राज्यांमध्ये भाजपाचे वर्चस्व कायम राहणार असा अंदाज आहे. पश्चिम बंगालमध्येही भाजपाने तृणमूल कॉंग्रेससमोर आव्हान निर्माण केल्याचे एक्झिट पोलमधून समोर येते.




## रेल्वेच्या एका तिकीटीवर करता येणार तिन्ही मार्गावर प्रवास

**मुंबई-** रेल्वेनं प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वे प्रशासनानं खुशखबर दिली आहे. कारण आता पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे आणि हार्बर रेल्वे मार्गावर एकाच तिकीटानं प्रवाशांना प्रवास करता येणार आहे. तसंच, या एका तिकीटावर प्रवशांना संपुर्ण दिवस तिन्ही मार्गावर अनलिमिटेड प्रवास करता येणार आहे. त्यामुळं येत्या काळात लोकांचा रेल्वे प्रवास आणखीनच सुखकर होणार आहे. प्रवाशांना रेल्वेचं तिकीट एक दिवसासह ३ आणि ५ दिवसांसाठी देखील काढता येणार आहे. संपुर्ण एक दिवसासाठी लोकलमधील सेकंड क्लास डब्याची तिकीट ७५ रुपये असेल, तर ३ दिवसांसाठी रेल्वे तिकीट ११५ रुपये असेल तसंच, ५ दिवसांसाठी रेल्वेचं तिकीट १३५ रुपये असणार आहे. त्याचप्रमाणं फस्ट क्लास डब्याची एक दिवसासाठी तिकीट २५५ रुपये असेल, तर ३ दिवसांसाठी रेल्वे तिकीट ४१५ रुपये असेल तसंच, ५ दिवसांसाठी रेल्वेचं तिकीट ४८५ रुपये असणार आहे. प्रवाशांनी या तीन तिकीटांमधील कोणतेही तिकीट खरेदी केल्यास त्यांना त्या तिकीटाची वैधता संपेपर्यंत अनलिमिटेड प्रवास करता येणार आहे.



## वरळी सशस्त्र दलात बारा वर्षांपासून १६३ पोलीस एकाच ठिकाणी नियुक्त

**मुंबई-** पोलीस अंमलदारांना एका पोलीस ठाण्यात पाच वर्षे व साइड ब्रँचला सहा वर्षांचा कार्यकाळ निश्चित आहे, पण मुंबई पोलीस दलाच्या वरळीतील सशस्त्र (एलए) विभागातील तब्बल १६३ अंमलदार गेल्या दहा ते बारा वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. विविध राजकीय नेते व वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांकडे हे अंमलदार वर्षानुवर्षे संरक्षक/मदतनीस म्हणून कार्यरत आहेत. मुंबई पोलीस दलातील सहायक फौजदार सुनील टोके यांनीच ही माहिती अधिकारातून ही बाब उघडकीस आणली आहे. वरळी सशस्त्र दलात दहा ते १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करीत असलेल्या अंमलदारांची माहिती त्यांनी 'आरटीआय'अंतर्गत मागितली होती. त्यानुसार, तब्बल १६३ अंमलदाराची यादी त्यांना देण्यात आली असून, त्यापैकी अनेक जण राजकीय नेते व वरिष्ठ आयपीएस अधिकारी यांचे कार्यालय किंवा निवासस्थानी मदतनीस म्हणून कार्यरत आहेत. टोके यांनी वाहतूक शाखेच्या गैरव्यवहाराबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यानंतर, ते सातत्याने खात्यातील गैरकृत्याबाबत आवाज उठवित राहिले आहेत. त्यामुळे त्यांना गैरवर्तन व शिस्तभंगाच्या कारवाई अन्वये ४ महिन्यापूर्वी निलंबित करण्यात आले असून, त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे.



## सोलापुरात पाच लाख लोकसंख्या तहानलेली



***सोलापूर - दुष्काळाच्या भीषण झळा सोलापूर जिल्ह्याला बसत आहेत. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक २२४ गावांमध्ये ५ लाख ८ हजार लोकांना २६० टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जनावरांसाठी चार तालुक्यांत १३७ चारा छावण्या सुरू केल्या आहेत. ८३ हजार ६०३ जनावरे छावण्यांमध्ये आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.***

सोलापूर जिल्ह्यात बार्शी २, करमाळा ११, मंगळवेढा ४३ व सांगोला ८१ अशा रीतीने सहा तालुक्यांत १३७ चारा छावण्या सुरू केल्या आहेत. उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, अक्कलकोट व माळशिरस या सहा तालुक्यांत अद्याप एकही चारा छावणी सुरू झालेली नाही. माढा तालुक्यात ४ छावण्यांना मंजुरी दिली असली तरी अद्याप सुरू झाल्या नाहीत. मंगळवेढा तालुक्यातील छावण्यांमध्ये २३ हजार २७५ तर सांगोला तालुक्यातील ८१ छावण्यांमध्ये ५३ हजार ६०६ जनावरे दाखल झाली आहेत.

भूजल सर्वेक्षण विभागाने ऑक्टोबर-जून या कालावधीत जिल्ह्यातील ६०७ गावांना टंचाई निर्माण होण्याचा अहवाल दिला होता. त्यापैकी २२४ गावांत टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. उजनी धरणाच्या शेजारी असलेल्या माढा तालुक्यातील ९७ व करमाळा तालुक्यातील ८८ गावांत टंचाई स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. उत्तर सोलापूर ८, दक्षिण सोलापूर ४२, अक्कलकोट ६६, बार्शी ७५, मोहोळ ४९, पंढपूर ४०, सांगोला ४२, मंगळवेढा २२ व माळशिरस तालुक्यातील ७८ गावांचा समावेश आहे.

दरम्यान, प्रति माणसी प्रति दिन २० लिटर पाणी देण्याचे सरकारचे आदेश असतानाही पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. मागणी असतानाही खेपा होत नसल्याच्या तक्रारी पालकमंत्र्यांच्या दौऱ्यात नागरिकांनी केल्या आहेत. मंजूर खेपा असतानाही टँकर मिळत नसल्याची तक्रार मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांनी केल्या आहेत.

## पुण्यात रेल्वे अपघात घडविण्याचा प्रयत्न

**पुणे - रेल्वे रुळावर लोखंडी रॉड ठेवून रेल्वे अपघात घडविण्याचा प्रयत्न होत असल्याची धक्कादायक बाब रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनात आली आहे. या प्रकारामुळे पुण्यात रेल्वे अपघात होण्याची शक्यताही रेल्वे प्रशासनाने वर्तवली आहे. गेल्या काही महिन्यांत पुणे विभागात अशा प्रकारच्या आठ ते दहा घटना घडल्या आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासन, रेल्वे पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, या प्रकाराचा कसून तपास करण्यात येत आहे.**



काही दिवसांपूर्वी हैद्राबाद-मुंबई एक्स्प्रेस पुण्याहून मुंबईकडे रवाना झाली असता, तळेगाव-कामशेत दरम्यान रेल्वे रुळावर मोठा लोखंडी रॉड ठेवल्याचे निदर्शनास आले. रेल्वेचालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवून तत्काळ आपत्कालिन ब्रेक लावत गाडी थांबविली. त्यामुळे मोठा अपघात टळला. याच प्रकारे रुकडी-हातकणंगले स्टेशनदरम्यानही लोखंडी रॉड ठेवण्यात आला होता. डिसेंबर २०१८ मध्ये पुणे-लोणावळा रेल्वे रुळावर देहू स्टेशनजवळ लोखंडी वस्तू ठेवण्यात आली होती. रेल्वेचा वेग जास्त असल्याने लोखंडी वस्तू रेल्वे चालकाच्या नजरेत आली नाही. वेगाने धावणाऱ्या रेल्वेच्या इंजिनने या वस्तूला जोरदार टक्कर दिली. त्यामुळे लोखंडी वस्तू रुळाच्या बाजूला उडून पडली. ही घटना घडल्यानंतर हा घातपाताचा प्रकार असल्याचे रेल्वेचालकाच्या लक्षात आले. ऑक्टोबर २०१८मध्ये नंद्रे-सांगली सेक्शनमध्ये रुळावर एकाच वेळी २० लोखंडी रॉड ठेवल्याचे आढळून आले. या सर्व घटनांविरोधात रेल्वे प्रशासनाने गुन्हे दाखल केले असून, आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

देशात अनेक ठिकणी रेल्वे रुळावर लोखंडी वस्तू ठेवून घातपात घडविण्याचे प्रकार घडले आहे. यामध्ये अनेक प्रवाशांना आपला प्राण गमवावा लागला आहे. या प्रकारामुळे एखादा रेल्वे अपघात झाला तर हजारो नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही नागरिकाने असे प्रकार करू नये, असे अवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्या वतीने चेंबूर, एम पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये आरोग्य शिबीर संपन्न



**मुंबई-** रोजी चेंबूर (पुर्व) येथील बृहनमुंबई महानगरपालिका, एम पश्चिम विभागातर्फे तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांची संयुक्त जयंती मोठया थाटात साजरी करण्यात आली. याचवेळी आश्रय ट्रस्टच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. यामध्ये संस्कार सेवा संस्थेच्या वतीने अल्पदरात चष्मावाटप, आवाज फाऊंडेशनच्या वतीने मोफत औषधे वाटप करण्यात आले. वेदान्त हॉस्पीटलचे तज्ञ डॉक्टरांनी यामध्ये भाग घेतला. पल्लवी रक्तपेढीकडे रक्तदान करण्यासाठी महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा ओघ जास्त प्रमाणात होता.

उर्वरित पृष्ठ 4 वर



## महापालिकेकडून बेस्टला आर्थिक बळ; दरमहा शंभर कोटींची मदत, सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत निर्णय

**मुंबई-** डबघाईला आलेल्या बेस्ट उपक्रमाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी अखेर महापालिकेने पावले उचलली आहेत. दरमहा शंभर कोटी रुपयांची मदत करण्याचा निर्णय महापौर दालनात आयोजित सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत गुरुवारी घेण्यात आला. नवनियुक्त आयुक्त प्रवीण परदेशी यांनी यास अनुकूलता दर्शविल्यामुळे बेस्टचा अर्थसंकल्प महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन होण्याचीही चिन्हे आहेत. कर्जाचे डोंगर, आणखी कर्ज देण्यास बँकांनी दिलेला नकार, प्रवासी संख्येत घट आणि वाढती तूट अशा अडचणींमध्ये



सापडलेल्या बेस्ट उपक्रमाला टाळे लागण्याची वेळ आली आहे. कामगारांचे वेतन देण्यासाठीही बेस्टच्या तिजोरीत पैसे नाहीत. यामुळे पालक संस्था असलेल्या महापालिकेने बेस्ट उपक्रमाची जबाबदारी घ्यावी, अशी मागणी सर्व राजकीय पक्ष, बेस्ट समिती आणि कामगारवर्गाकडून होत आहे. बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प महापालिकेत विलीन करण्याचा ठरावही एकमताने पालिका महासभेत मंजूर करण्यात आला होता.



## पनवेल-कर्जत दुहेरी मार्ग लवकरच

**मुंबई-** पनवेल ते कर्जत अशा थेट लोकल गाड्या सुरू होण्याचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. एमयूटीपी-३ अंतर्गत असलेल्या पनवेल ते कर्जत दुहेरी मार्गाचे काम पावसाळ्यानंतर सुरू होणार आहे. या कामासाठी निविदा काढण्यात आली असून त्याला प्रतिसादही मिळाल्याची माहिती एमआरव्हीसीतील (मुंबई रेल्वे विकास महामंडळ) वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. पनवेल ते कर्जत सध्या एकच मार्गिका असून लांबपल्ल्याच्या गाड्या किंवा मालवाहतुकीसाठी त्याचा वापर होत असतो. कर्जत आणि पनवेलमधील प्रवासासाठी व्हाया ठाणे किंवा कुर्ला मार्गे लोकलने जावे लागते. अन्यथा रस्ते वाहतुकीचा पर्याय निवडावा लागतो. मात्र त्यात बराच वेळ जातो. जर पनवेल ते कर्जत अशी थेट लोकल सुरू झाल्यास त्याचा फायदा अनेक प्रवाशांना मिळू शकतो.

एमयूटीपी-३ मधील प्रकल्पांचा खर्च १० हजार ९४७ कोटी रुपये असून यात पनवेल ते कर्जत दुहेरी मार्गाचा खर्च २ हजार ७८३ कोटी रुपये आहे. एमयूटीपी-३ साठी रेल्वे, राज्य सरकारकडून निधी मिळतानाच जागतिक बँकेकडूनही निधी मिळणार होता. मात्र या प्रकल्पाऐवजी एमयूटीपी-३ ए मधील पनवेल ते विरार नवीन मार्गाला प्राधान्य द्या, अशी अट बँकेने ठेवली होती. परंतु ही चर्चा फिस्कटली. त्यामुळे निधीसाठी एमआरव्हीसीने अन्य बँकांशी बोलणी सुरू केली असून त्यावर येत्या दोन ते तीन महिन्यांत शिक्कामोर्तब केले जाणार आहे. तोपर्यंत रेल्वे व राज्य सरकारकडून मिळालेल्या निधीवर एमयूटीपी-३ मधील काही कामे केली जात आहेत. यातून पनवेल ते कर्जत दुहेरी मार्गिकेच्या कामालाही मुहूर्त देण्यात आला आहे.

## अकरावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा; नव्या ६५ महाविद्यालयांची नोंदणी

**मुंबई-** वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशांत मराठा आरक्षणावरून गोंधळ निर्माण झाल्यानंतर दहावीतील विद्यार्थ्यांच्या मनात अकरावी प्रवेशाची धाकधूक होती. मात्र यंदा नवीन ३५ महाविद्यालयांनी प्रवेशांसाठी नोंदणी केल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल. ऑनलाइन अकरावी परीक्षेसाठी मुंबई उपसंचालक विभागाकडून सुरू असलेली नोंदणीप्रक्रिया बुधवारी पूर्ण झाली असून ८४९ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे. यामध्ये ३५ नवीन महाविद्यालयांचा समावेश असून विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक नवीन महाविद्यालयांची नोंदणी झाली आहे.

नोंदणी झालेल्या ८४९ महाविद्यालयांमध्ये ३५ नवीन महाविद्यालयांचा समावेश आहे. या ३५ महाविद्यालयांमध्ये कला शाखेसाठी १३, विज्ञान शाखेसाठी २७ तर वाणिज्य शाखेसाठी २५ तुकड्यांसाठी नोंदणी करण्यात आल्याची माहिती उपसंचालक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. मुंबई उत्तर, मुंबई पश्चिम, मुंबई दक्षिणसह ठाणे आणि पनवेल या विभागांमधून नवीन महाविद्यालयांनी नव्याने नोंदणी केली आहे. नोंदणी प्रक्रियेला सुरुवातीला अल्प प्रतिसाद



मिळाला असला तरी शेवटच्या पाच दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणात नोंदणी करण्यात आल्याची माहिती उपसंचालक कार्यालयाकडून देण्यात आली. दहावीच्या फुगलेल्या निकालांमुळे अकरावीला प्रवेश मिळविण्यासाठीची स्पर्धा गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यंदापर्यंत सामाजिक आरक्षणे आणि वेगवेगळ्या कोट्यातील जागा वगळून खुल्या गटासाठी २३ टक्के जागा शिल्लक राहात होत्या. यंदा त्यामध्ये मराठा समाजासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. त्यामुळे व्यवस्थापन कोट्यात अतिरिक्त शुल्क भरून प्रवेश घेणे, संस्थांतर्गत कोट्यात प्रवेश घेणे किंवा अल्पसंख्याकांसह एखाद्या संस्थेने त्यांचा संस्थांतर्गत कोटा केंद्रीय प्रवेश फेरीसाठी समर्पित करण्याची आशा बाळगणे एवढेच पर्याय खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध राहणार आहेत. मात्र आता नवीन महाविद्यालयांच्या नोंदणीमुळे एका तुकडीत ८० विद्यार्थी सामावले जातील. त्यामुळे अकरावी प्रवेशोच्छुक सर्वच विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल.

## अग्निसुरक्षेत बेपर्वाई!

### तीन हजार इमारती, आस्थापनांचे अग्निप्रतिबंधक उपायांकडे दुर्लक्ष; २७ जणांविरोधात न्यायालयात खटला दाखल करणार



**मुंबई-** मुंबईतील उंच इमारतींमध्ये आग लागून जीवितहानी होण्याच्या घटना वारंवार घडत असतानाही शहरातील टोलेजंग इमारती आणि आस्थापनांची आगीबाबत बेपर्वाई कायम आहे. अग्निप्रतिबंधक यंत्रणेचा अभाव असलेल्या किंवा त्यात त्रुटी असलेल्या साडेतीन हजार निवासी इमारती आणि व्यावसायिक आस्थापनांपैकी अवघ्या ५३२ इमारतींनीच ही यंत्रणा अद्ययावत करण्याचे गांभीर्य दाखवले आहे. उर्वरित तीन हजार इमारतींनी पालिकेची सूचना धाब्यावर बसवली आहे. यातल्या २७ जणांविरोधात न्यायालयात खटला दाखल करण्याची तयारी अग्निशमन दलाने सुरू केली आहे. रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी बहुमजली इमारतींमध्ये अग्निप्रतिबंध यंत्रणा बसविणे सक्तीचे आहे. मात्र, अनेक ठिकाणी त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचे आगीच्या काही दुर्घटनांनंतर उजेडात आले आहे. इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या अग्निप्रतिबंध यंत्रणेची अग्निशमन दलाकडून तपासणी केली जाते. तपासणीअंती यंत्रणेतील त्रुटी सुधारण्याची सूचना करण्यात येते. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवनरक्षक उपाय कायद्यातील तरतुदीनुसार भविष्यात दर सहा महिन्यांनी इमारतीमधील अग्निप्रतिबंध यंत्रणेची संबंधित परवानाधारक संस्थेकडून तपासणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन दलाला सादर करणे बंधनकारक करण्यात आहे. मात्र बहुतांश सोसायट्या, हॉटेल्स, मॉल्स, विविध आस्थापना याकडे कानाडोळा करीत असतात. त्यामुळे आग लागल्यानंतर इमारतीमधील सदोष अग्निप्रतिबंध यंत्रणेचा उपयोग होत नाही. परिणामी, आगीची तीव्रता वाढून जीवित आणि मालमत्तेचे मोठे नुकसान होते, असे अग्निशमन दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यान बोलताना सांगितले.

सदोष अग्निप्रतिबंध यंत्रणेत सुधारणा करण्याकडे कानाडोळा करणाऱ्या २७ जणांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्याची तयारी अग्निशमन दलाने केली आहे. अग्निशमन दलाने याबाबतची तपशीलवार माहिती पालिकेच्या विधि खात्याकडे पाठविली असून लवकरच या २७ जणांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार असल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.

## अतिधोकादायक १५९ इमारतींचा वीज, पाणीपुरवठा खंडित करा



**मुंबई-** मान्सूनला जेमतेम काही दिवस उरले असताना पावसाळापूर्व कामे मात्र धीम्या गतीने सुरू आहेत. त्यामुळे धोकादायक इमारत, दरडींचे भय कायम आहे. याची गंभीर दखल घेत अतिधोकादायक ३९८ इमारतींपैकी १५९ इमारतींचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्याचे निर्देश पालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांनी शुक्रवारी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सोबतच दरड कोसळून दुर्घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना हाती घेऊन या परिसरांकडे विशेष लक्ष देण्याची सूचनाही केली.

आयुक्त प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली पालिका मुख्यालयात शुक्रवारी सर्व प्राधिकरणांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत धोकादायक इमारतींसह दरड परिसरांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे, असे आयुक्तांनी सांगितले.

दरवर्षी पावसाळ्यात धोकादायक इमारती कोसळून निष्पाप जिवांचे बळी जातात. त्यामुळे या इमारती पावसाळ्यापूर्वी खाली करण्यावर पालिकेचा भर असतो. मात्र, रहिवाशी स्थलांतरित होण्यास तयार होत नाहीत. त्यात यावेळेस लोकसभा निवडणुकीमुळे अशा इमारतींची यादी जाहीर करण्याचे काम रखडले होते.

आयुक्तांनी अतिधोकादायक ३९८ इमारतींपैकी १५९ इमारतींचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्याचे निर्देश दिले.

## बलात्कारपीडितेची साक्ष नेहमीच विश्वासार्ह मानली जाऊ शकत नाही!

**मुंबई-** बलात्कारपीडितेची साक्ष नेहमीच पुरेसा पुरावा वा विश्वासार्ह म्हणून ग्राह्य धरली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करत ठाणेस्थित १९ वर्षांच्या तरुणाची उच्च न्यायालयाने बलात्काराच्या आरोपातून निर्दोष सुटका केली. अशा प्रकरणांमध्ये पीडितेची साक्ष ही ठोस आणि विश्वासार्ह असायला हवी, असेही न्यायालयाने निकाल देताना प्रामुख्याने स्पष्ट केले.



बलात्कारपीडितेची साक्ष ठोस आणि विश्वासार्ह नसेल तर अशा प्रकरणातील आरोपीला संशयाचा फायदा दिला जाऊ शकतो, असे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी १९ वर्षांच्या सुनील शेळके याची बलात्काराच्या आरोपातून सुटका करताना नमूद केले. कनिष्ठ न्यायालयाने बलात्काराच्या आरोपात दोषी ठरवून सुनावलेल्या सात वर्षांच्या शिक्षेला शेळके याने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

मार्च २००९ मध्ये ही घटना घडली होती. पीडितेने केलेल्या तक्रारीनुसार, घटनेच्या दिवशी गावकरी होळीचा आनंद लुटत असताना आरोपी आणि त्याच्या दोन मित्रांनी तिला पकडून नदीजवळील ओसाड जागी नेले आणि तेथे आरोपीने तिच्यावर बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी आपण घरी आल्याचे आणि आपल्यावर बेतलेल्या प्रसंगाची माहिती कुटुंबीयांना दिल्याचा दावा या पीडितेने केला होता. महिन्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला; परंतु त्याच वेळी या घटनेपूर्वी पीडित तरुणी आणि शेळके दोघेही लग्न करणार होते, ही बाबही पुढे आली. शेळके याने आपल्या अपिलात त्याच्यावर लावण्यात आलेल्या सर्व आरोपांचे खंडन केले. शिवाय त्या दोघांचे काही कारणास्तव लग्न होऊ शकले नाही याचा वचपा काढण्यासाठी पीडित तरुणी आणि तिच्या कुटुंबीयांनी त्याच्यावर बलात्काराचा आरोप केला.

न्यायालयाने या सगळ्या बाबी प्रामुख्याने विचारात घेतल्या. पीडित तरुणीने तिच्यासोबत नेमके काय झाले हे ठाम व स्पष्टपणे सांगितलेले नाही. शिवाय वैद्यकीय अहवालातही तिच्या शरीरावर कुठल्याही जखमा आढळलेल्या नसल्याचे उघड झाले. पीडितेचे आरोपीशी लग्न होणार होते याची घटनेआधी चर्चा होती; किंबहुना जो पुरावा पुढे आला आहे त्यावरून घटनेच्या दिवशी दोघेही एकत्र होते.

## डेबिट-क्रेडिट कार्डद्वारे मेट्रोचे तिकीट मिळणार

**मुंबई-** घाटकोपर-वसरेवा-घाटकोपर या मुंबई 'मेट्रो वन'चे तिकीट प्रवाशांना आता आणखी सहजतेने उपलब्ध होणार आहे. डेबिट-क्रेडिट कार्डद्वारेही मेट्रोचे तिकीट देण्याचा निर्णय घेतला असून गुरुवारपासून याची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे मेट्रो वनकडून सांगण्यात आले.

मुंबई मेट्रो वन सेवेत येताच प्रवाशांसाठी मासिक ट्रिप पास, स्टोअर व्हॅल्यू पास व स्कीप क्यू या तिकीट सेवा सुरू केल्या. यात एकेरी आणि दुहेरी (परतीचाही) प्रवास अशा सुविधाही आहेत. सार्वजनिक वाहतुकीमध्ये तिकीट घेताना डेबिट-क्रेडिट कार्टसारख्या अन्य पर्यायांच्या शोधात प्रवासी असतात. त्यामुळेच



मुंबई मेट्रो वनने डेबिट-क्रेडिट कार्डद्वारे तिकीट देण्याचा निर्णय घेतला. जवळपास साडेचार लाख मेट्रो प्रवाशांना त्याचा फायदा मिळणार आहे. इन्स्टामोजो या पेमेंट गेटवेने टेक्नॉलॉजी पार्टनर म्हणून ही सुविधा उपलब्ध केली आहे. या सुविधेत मेट्रो स्थानकात पीओएस (पॉइंट ऑफ सेल) मशीन कार्यान्वित करण्याची गरज नाही. तसेच प्रवाशांना त्यांच्या स्मार्ट भ्रमणध्वनीमध्ये ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्याची गरज नाही. प्रवाशांनी मेट्रो तिकीट खिडक्यांवर जाऊन स्टॅटिक क्यूआर कोड भ्रमणध्वनीवर स्कॅन करून किंवा खिडक्यांवर नमूद केलेली लिंक टाइप करून आणि डेबिट-क्रेडिट कार्डचा तपशील देऊन शुल्क भरता येणार आहे.

## वाहनतपासणी अधिक कठोरतेने करा

**मुंबई-** मुंबईसह राज्यभरात वाढलेले जीवघेणे अपघात, डोंबिवलीतील कॅरमपटू जान्हवी मोरे हिचा झालेला अपघाती मृत्यू या पार्श्वभूमीवर वाहनांची चाचणी व तपासणी अधिक कठोरपणे करण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे.

अधिकाऱ्यांची बैठक घेऊन एक आराखडा बनवण्याची सूचना परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी बुधवारी परिवहन आयुक्त शेखर चन्ने यांना केली. याची दखल घेऊन परिवहन आयुक्त शेखर चन्ने यांनी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेतली. यात वाहनचालकांची होणारी चाचणी, दिला जाणारा परवाना, व्यावसायिक वाहनांचीही होणारी तपासणी इत्यादी मुद्यांवर चर्चा झाली. बैठकीत वाहनचाचणी व तपासणी अधिक कठोरतेने करण्याचे आदेश आरटीओंना देण्यात आले. ही तपासणी झाल्यानंतरही त्यातील काही ठरावीक वाहनचालकांची पुनर्चाचणी किंवा



तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जेणेकरून कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत.

परिवहन आयुक्त चन्ने यांनी सांगितले की, 'वाढते अपघात पाहता अधिक कठोरतेने आरटीओतील वाहनचाचणी आणि तपासणी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचा आढावाही घेण्यात येणार आहे.'

२०१८ मध्ये राज्यात एकूण ३५ हजार ७१७ अपघात झाले असून यात १३ हजार २६१ जण मृत्युमुखी पडले आहेत. तर २० हजार ३३५ जण गंभीर जखमी झाल्याची नोंद आहे. तसेच डोंबिवलीत राहणाऱ्या जान्हवी मोरेचा शिळफाटा रस्त्यावरील पलावा बस थांबा येथे रस्ता ओलांडताना ट्रकने उडवल्याने मृत्यू झाला. त्यामुळे वाहनचालकांना दिला जाणारा परवाना, अपघात रोखण्यासाठी संबंधित सरकारी यंत्रणांचे अपयश यातून समोर आले.

## अंगणवाडी सेविका जून महिन्यात धडकणार मंत्रालयात

**मुंबई-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑक्टोबर २०१८ मध्ये राज्यातील अंगणवाडी सेविका आणि आशा सेविकांच्या मानधनात दुपटीने वाढ केली होती. नोव्हेंबर २०१८ मध्ये ही



मानधनवाढ अंगणवाडी सेविकांना मिळणे अपेक्षित होते. मात्र राज्य शासनाने अद्यापही मानधनवाढ लागू केलेली नाही. याविरोधात राज्यभरातील अंगणवाडी सेविका जून महिन्यात मंत्रालयावर धडकणार आहेत.

अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी वारंवार आंदोलन करूनही सरकारकडून फक्त आश्वासन मिळत असल्याने अंगणवाडी सेविका संतप्त झाल्या आहेत. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील अंगणवाडी सेविका प्रत्येक जिल्हा परिषदेच्या कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. या मोर्चानंतरही कुठला प्रतिसाद मिळाला नाही, तर ११ जून रोजी अंगणवाडी सेविका मंत्रालयावर विराट मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडणार आहेत. राज्याच्या विविध भागांतील जवळपास दोन लाख अंगणवाडी सेविका या मोर्चात सहभागी होणार आहेत.

## तरुणांत वाढतोय उच्च रक्तदाबाचा धोका: उशिराने निदान होत असल्याचे उघड

**मुंबई- बदलती जीवनशैली, वाढता ताण आणि आहार यांमुळे विविध आजार डोके वर काढत आहेत. परिणामी, जागतिक उच्च रक्तदाब दिनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा राज्यात आता तरुण पिढीमध्ये उच्च रक्तदाबाचा धोका वाढत असल्याचे समोर आले आहे. मात्र बऱ्याचदा या आजाराविषयी लवकर निदान होत नसल्याचेही समोर आले आहे.**

गेल्या वर्षी २०१७-१८ मध्ये राज्यभरात ७४ लाख ७७ हजार १०१ रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यातील २ लाख ६ हजार ९४५ रुग्णांना उच्च रक्तदाब असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये तरुणांची संख्या अधिक असल्याचे समजते.

केंद्र शासनाच्या नॅशनल प्रोग्राम फॉर प्रिव्हेंन्शन ॲण्ड कंट्रोल ऑफ कॅन्सर, डायबेटीस, सीव्हीडी ॲण्ड स्ट्रोक यांच्या संस्थेच्या माध्यमातून हे निरीक्षण समोर आले आहे. गेल्या वर्षी संस्थेच्या माध्यमातून ही तपासणी राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आली होती, आता मात्र ती ३४ जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. या अहवालानुसार, तरुण पिढीमध्ये उच्च रक्तदाबाचे प्रमाण वाढत असल्याचे समोर आले आहे, ही चिंताजनक स्थिती असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी मांडले आहे. धावपळीची जीवनशैली, कामाचे वाढलेले तास, धूम्रपानाच्या जोडीला मद्यपान आणि आरोग्याला अपायकारक ठरणाऱ्या खाण्याच्या सवयींमुळे अनेक तरुण-तरुणी उच्च रक्तदाबाच्या समस्येला बळी पडतात. हा आजार अन्य गंभीर आजारांना आमंत्रण देऊ शकतो. त्यामुळे या आजाराची वेळीच माहिती करून घेणे आणि तणावमुक्त स्वस्थ जीवनमान आत्मसात करणे अत्यावश्यक असल्याचे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले.



रक्तदाब जितका अधिक तितकीच हृदयविकाराचा झटका किंवा हृदय बंद पडण्याची समस्या उद्भवण्याची शक्यता अधिक असते. तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाचा धोका वाढत आहे, अशी माहिती हृदयविकारतज्ज्ञ डॉ. महेश घोगरे यांनी दिली. छातीत धडधड होणे, सततची डोकेदुखी, डोळ्यांपुढे अंधारी येणे, हातापायाला बधिरता येणे व चक्कर येणे ही उच्च रक्तदाबाची लक्षणे आहेत. परंतु पुष्कळ व्यक्तींमध्ये या आजाराने गंभीर स्वरूप धारण करेपर्यंत कोणतेही लक्षण दिसून येत नाही व लक्षात येते तेव्हा मूत्रपिंड, डोळे व हृदय या नाजूक इंद्रियांवर कायमस्वरूपी दुष्परिणाम झालेले असतात. ते मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकतात. उच्च रक्तदाबामुळे हृदयावर अधिक ताण येतो आणि अपेक्षित असलेल्या कार्यापेक्षा अधिक कार्य हृदयाला करावे लागते. त्यामुळे हृदयाचा आकार मोठा आणि लहान होण्याची कृती घडत असते. उच्च रक्तदाबामुळे हृदयाला पंप करण्यासाठी अधिक श्रम करावे लागतात. याचा थेट परिणाम हृदयाचे कार्य बंद पडण्यात होतो, असे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले.

## संपादकीय...

# जातींमध्ये तरुणांची घुसमट


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

**समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध त्या-त्या समाजातील तरुणांनीच लढा देण्याची महाराष्ट्रातील परंपरा मोठी आहे. 'जिहादे तलाक' हे १९७० च्या दशकातील अभियान असो की त्यानंतरच्या दशकातील जटामुक्ती चळवळ, तरुणांना अशी पावले उचलण्यासाठी निश्चितपणे आत्मविश्वास वाटेल, असा इतिहास आपल्या राज्याला आहे. कंजारभाट समाजातील 'कौमार्य चाचणी'ची प्रथा स्त्रीत्वाचा अवमान करणारी असल्याने ती बंद करावी, असा आग्रह याच समाजातील तरुण-तरुणींनी धरला तोही महाराष्ट्रातच. मात्र हा आग्रह धरणाऱ्या एका तरुणाला जातिबहिष्कृत ठरवण्याचा, त्याच्या दु:खात आनंद मानण्याचा प्रकारही महाराष्ट्रातच घडावा, हे संतापजनक आहे. 'महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम २०१६' असा कायदा करणारे देशातील पहिले राज्य ठरल्याबद्दल उण्यापुऱ्या तीन वर्षांपूर्वी ज्यांनी स्वत:ची पाठ थोपटून घेतली, त्या सर्वांपुढे हे आव्हान आहे. या कायद्याच्या आधाराने अधूनमधून तक्रारी पोलिसांकडे दाखल होत असतात. तेवढ्यापुरती त्यांची चर्चा होते. मग पुन्हा आणखी कोठेतरी सामाजिक बहिष्काराचा प्रकार घडतो, तेव्हा जातपंचायतींचे दात अद्यापही कसे शाबूत आहेत हेच दिसून येते. मुंबईच्या ओसरीवर असलेल्या अंबरनाथमध्येही हेच घडले. विवेक तमायचीकर या तरुणाच्या आजीच्या मृत्यूनंतर, अंत्ययात्रेवर बहिष्कार घालण्यावर न थांबता त्याच भागातील हळदी समारंभ सुरू ठेवा, मोठ्याने गाणी लावून नाचा, असा प्रकार तेथे घडला. हे विवेक तमायचीकर हे कंजारभाट समाजातले. माझ्या पत्नीची कौमार्यचाचणी करणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली होती आणि समाजातील काही तरुणांनाही ती मान्य होती. या समाजातील नवविवाहितांबद्दल नवऱ्याला 'तुला दिलेला माल खरा होता की खोटा' अशा भाषेत विचारणा करून कौमार्यचाचणीचा निकाल जाहीरपणे सांगण्यास भाग पाडणारी जातपंचायत. असल्या प्रकाराला कायद्याचा नव्हेच पण नीतिमत्तेचाही आधार नाही, हेच विवेकसह अनेकजण सांगू लागले होते. अशा वेळी आपली सद्दी कायम राखण्यासाठी जातपंचायती जे करतात, तेच अंबरनाथमधील विवेक तमायचीकर यांच्याबाबत घडले- बहिष्कार! समाजाची एकत्रित वस्ती, बहुतेकांचा एकच व्यवसाय, बेटीबंदी अशी रचना असल्यामुळे बहिष्काराचे हत्यार प्रभावी ठरते. केवळ कंजारभाट नव्हे, अन्य अनेक समाजांच्या जातपंचायती याच प्रकारे आपले अस्तित्व दाखवून देतात. मग जालन्यात घडला तसा, राजभोई समाजाच्या जातपंचायतीने 'जातीत परत घेण्यासाठी' १५ लाख रुपयांची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस येतो. किंवा सासरच्यांवर गुन्हा दाखल केला म्हणून विवाहित तरुणीवर आणि तिच्या माहेरच्यांवर बहिष्कार टाकल्याचे उघड होते. या प्रकारांची वाच्यता आता कुठे होऊ लागली आहे. एरवी जातिभ्रष्ट होऊ नये, एवढ्याच भीतीपायी जातीचे कायदे- ज्यांचा भारतीय संविधानाशी आणि त्यातील मूलभूत हक्कांशी संबंध नाही असेही नियम- पाळण्याची सक्ती प्रत्येक सदस्यावर असतेच. ज्या जाती प्रगत, पुढारलेल्या, सुशिक्षित आहेत, त्यांमध्ये जातपंचायत नाही, हे खरे. पण जातीची प्रगती होते ती माणसांमुळेच ना? गेल्या दोन दशकांत कोणत्याही जातीच्या, कोणत्याही आर्थिक स्तरांतील माणसांना, आसपासचे भौतिक वातावरण किमान आर्थिक प्रगतीसाठी खुणावते आहे. इंग्रजी शाळा, मॉल आदी या भौतिक प्रगतीची गावोगावी पोहोचली रूपे. पण याच काळात वैचारिक वातावरण मात्र चित्रवाणी वाहिन्यांवरील चर्चापुरते. अशा काळात विशी-पंचविशीच्या तरुण-तरुणींची घुसमट जातीच्या अनधिकृत- पण सक्तीच्या- नियमांनी होतेच आहे. एकदा घुसमट सहन करायचे ठरवले की, मासिक पाळीला अमंगळ मानण्यामागे कसे विज्ञान आहे, असले युक्तिवाद कथित प्रगत जातींतूनही होतच असतात.. अशा वेळी स्वत:च्या जातीच्या अंधविश्वासांविरुद्ध उभे राहणारे विवेकाचे आवाज जपायलाच हवेत.**





# भविष्यभयाची चाहूल...

**'नैसर्गिक मृत्यू' म्हणजे आत्महत्या नव्हे. आज जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याकडे पाहता आणखी काही वर्षांनी होणाऱ्या नैसर्गिक मृत्यूंपैकी अनेक मृत्यू म्हणजे आत्महत्याच असतील. पण या भविष्यास आज फारसे गांभीर्याने घेतलेच जाणार नाही. कारण, आणखी काही वर्षांनंतरच्या आत्महत्यांची तयारी आजपासूनच सुरू झालेली आहे याचीच जाणीव रुजलेली नाही.**

ज्या काही मोजक्यांना ती जाणीव झालेली असते, त्यांना मूर्खात काढले जात नसले, तरी फारसे गांभीर्यानेही घेतले जात नाही. सामूहिक मानसिकतेला तशी सवयच नसते. भविष्यातील संकटांचे भय आतापासून कशाला वागवायचे, या मानसिकतेलाच मर्दुमकी मानले जाते, आणि जेव्हा ही मर्दुमकी मनामनांत भिनते, तेव्हा भविष्यात कधी तरी येऊ घातलेल्या, संभाव्य अशा संकटांची चिंता करणे या प्रकारास थाराही नसतो. गेल्या काही पिढ्यांपासून काही जणांना भविष्यातील 'आत्महत्यां'च्या पूर्वतयारीची चाहूल लागली होती, तसे इशारे त्यांनी वारंवार दिलेही होते. पण त्याचे गांभीर्य वेळीच उमगले असते, तर नैसर्गिक मृत्यूंच्या नावाखाली होणाऱ्या या 'आत्महत्यां'च्या शक्यतादेखील पुसणे शक्य झाले असते. मरण तर प्रत्येकास येणारच असते. मृत्यूने अचानक गाठू नये, आलेच तर नैसर्गिक मरण यावे एवढी माफक इच्छा करणेच आपल्या हाती असते. भविष्यात मात्र, नैसर्गिक मृत्यू हे प्रत्यक्षात आत्महत्याच होत्या, हे वास्तव नजरेआड केले जाईल. ही चर्चा भयंकर आहे, हे खरे आहे. या चर्चेची कुणाचीच फारशी इच्छा नसते. म्हणूनच अशा चर्चेच्या मुळाशी जाणे टाळण्याकडेच सर्वांचा कल असतो. पण असे केल्याने चर्चेचे मूळ टळणार नसते. ते दबा धरून बसलेलेच आहे. त्याच दिशेने पावलापावलाने पुढे जात असताना, वाटेवर दबा धरून बसलेल्या त्याच्या अस्तित्वाची जाणीवदेखील आपल्याला असते. ज्याची भीती वाटते, त्याकडे पाहावयाचेच नाही, या मानसिकतेतून त्याकडे लक्ष न देणेच श्रेयस्कर मानले जाते..

जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीमुळेच भविष्यातील या भयाला आणखी भीषण करण्यासाठी निसर्गानेही साथ दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून तेदेखील आपण अनुभवत आहोत. या भयाने आपल्या अस्तित्वाची पहिली चाहूल दिली, त्याला आणखी तीन वर्षांनी ५० वर्षे पूर्ण होतील. म्हणजे, त्या भयाचा पहिला भयाण अनुभव घेणारी एखादीच पिढी त्या आठवणींनी थरकापत असेल. १९७२ मध्ये राज्यात पडलेला भीषण दुष्काळ ज्यांनी अनुभवला, तो प्रत्येक जण, त्यानंतरच्या प्रत्येक दुष्काळाची केवळ तुलनाच त्या दुष्काळाशी करतो. 'तसा दुष्काळ पाहिला नाही' असे काही जण म्हणतात, तर, 'यंदाचा दुष्काळ १९७२ पेक्षाही भयंकर आहे', असे काही जण बोलून दाखवितात. नंतरच्या पिढीला मात्र तो दुष्काळ माहीत नाही. १९७२चा दुष्काळ काय होता, याची उत्सुकता दाखविण्याचेही कोणतेच कारण त्यांच्याकडे नाही. कदाचित, यंदाचा दुष्काळ भीषण आहे, हे या पिढीतील अनेकांना अनुभवाने किंवा माध्यमांमधून मिळणाऱ्या माहितीमुळे समजतही असेल. पण, यंदाचा दुष्काळ हा दुष्काळाचा पहिलाच फेरा नाही, याआधीही गेल्या ५० वर्षांत असे अनेक फेरे आपल्या राज्याने अनुभवले आहेत आणि त्यामध्ये अनेक संसार होरपळलेही आहेत. त्यामुळे, प्रत्येक दुष्काळ हा तितकाच भयंकर असतो, त्यामध्ये होरपळणाऱ्या आयुष्यांना पुन्हा सावरण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रत्येक संघर्षांत उरलीसुरली शक्ती अधिक क्षीण होत असते, आणि जगण्याची उमेदही संपत जाते.

नेमक्या याच वास्तवाची भीती वाटत असते. त्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहण्याची आपली हिंमतच नसते, म्हणून त्याकडे पाहणे शक्यतो टाळावे अशाच मानसिकतेचा पगडा समाजावर बसलेला असतो. म्हणूनच, 'आगामी काळात पाण्यासाठी युद्धे होतील' असा इशारा पहिल्यांदा दिला गेला त्याला आता एका पिढीच्या आयुष्याचा काळ लोटल्यानंतरही त्याचे गांभीर्य आपल्या लक्षात आलेले नाही. एकीकडे पाण्याच्या थेंबाथेंबासाठी हजारो जीव वणवण रानोमाळ भटकत असताना, आणि पाणी नावाचे जीवन पदरात पडावे यासाठी जीव पणाला लावत असताना, दुसरीकडे मात्र, याच पाण्याचे पाट वाहताना दिसतात. भविष्यातील भयाचे सावट आपल्यापर्यंत पोहोचलेले नाही अशा वेडगळ समजुतीचाच हा एक शहाणा आविष्कार मानावा लागेल. उलट, दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती आहे, आणि त्यावर मात करण्याचे आव्हानही स्वत:स प्रस्थापित करण्याची सुवर्णसंधी आहे, अशा दोन्ही समजुती काही ठरावीक वर्गाने स्वत:पुरत्या समाजात रूढ केल्या आहेत. त्यात त्यांना बरेचसे यशदेखील आले आहे, हे वर्षागणिक वाढत जाणाऱ्या दुष्काळाच्या तीव्रतेवरून जाणवताना दिसते.

दुष्काळावर मात करण्याचे अनेक प्रयोग गेल्या काही वर्षांत सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी प्रामाणिकपणे केलेदेखील असतील, पण दुष्काळ टाळण्याचे, किंवा दुष्काळाची कारणेच नष्ट करण्याचे प्रयोग मात्र अभावानेच झाले, हे याचे मूळ कारण आता लपून राहिलेले नाही. जमिनीवरील पाण्याचे सारे स्रोत अक्षरश: पिळून कोरडे झाल्यानंतर भूगर्भाच्या तळात कोठेही साठलेल्या पाण्याचा प्रत्येक थेंब उपसून त्याचा 'पैका' करण्याची मानसिकता कमी झाली असती, भूगर्भात साठलेल्या पाण्याला निवांतपणा मिळाला असता, तर ही वेळ आली नसती, असे वर्षांनुवर्षे ओरडून सांगताना जलसंपत्तीच्या असंख्य अभ्यासकांच्या घशाला कोरड पडली. नगदी पिकांच्या हव्यासापोटी पाण्याचा भरमसाट वापर करताना, जमिनीच्या पोटात खोलवर शिरून तेथील पाणी उपसताना कुणाला भविष्यातील भयाची चिंता भेडसावलीच नाही. तसे वेळीच झाले असते, तर जमिनीवर खड्डे खोदून आणि प्लास्टिक अंथरून त्यामध्ये पाणी साठविण्याचे तात्पुरते प्रयोग करण्याऐवजी, भूजलाच्या संवर्धनासाठी नगदी पिकांचे कठोर नियोजन करण्याचा शहाणपणा कृतीत उतरविला गेला असता. पण प्रत्येक दुष्काळात हीच चर्चा होते, आणि हे करावयास हवे असे सांगणारे जाणकार मात्र, त्यासाठीच्या कृतीवर भर देत नाहीत, हे वास्तव आता लपून राहिलेले नाही.

# वसईतील सर्वच राजकीय पक्षांची कार्यालये अनधिकृत

**नालासोपारा- वसई तालुक्यात गेल्या २५ वर्षांपासून निर्विवाद सत्ता असलेली बहुजन विकास आघाडी असो की सर्वच राजकीय पक्ष असो प्रत्येकाने कुठेना कुठे नाल्यावर, रस्त्यावर जागा मिळेल त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे उभी करून पक्षाची कार्यालये थाटली आहे. या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी मनपा किंवा कोणत्याही सामाजिक संघटनेने पुढाकार न घेता आजपर्यंत ते काणाडोळा करतच आले आहे. आता अशा अनधिकृत पक्षांच्या कार्यालयांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. वसई विरार मनपाचे आयुक्त बळीराम पवार त्यांच्यावर कारवाई कधी करणार याकडे सर्व सामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

वसई तालुक्यात गेल्या दोन ते तीन वर्षांपासून सरकारी जागा, गार्डन, शाळा, हॉस्पिटल याव्यतिरिक्त आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकामे वसई विरार मनपाने भुईसपाट केली आहेत. कित्येक गरीब लोकांना व जनतेला सणांच्या वेळी, उन्हाळ्यात, पावसाळ्यात बेघर केले आहे पण या राजकीय पक्षांच्या अनधिकृत कार्यालयावर कारवाई करण्याची साधी हिंमत दाखवली नसल्याने लोकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. या अशा राजकीय पक्षांच्या कार्यालयाला तर मनपाने साधी नोटीस सुद्धा धाडली असल्याचे आठवत नाही. मनपात सत्ताधारी पक्षातले नगरसेवक, दुसऱ्या पक्षातील नगरसेवक, विविध पक्षातील नेतेमंडळी बिनधास्त नाले व मोकळ्या जागेवर आपली अनधिकृत कार्यालये उभी करून आपले बस्तान मांडताना दिसत आहे पण मनपा मूग गिळून, गप्प बसून कारवाई का करत नाही हा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

मनपा अनधिकृत बांधकामावर कारवाई करतांना रीतसर नोटीस पाठवून पोलीस बंदोबस्त घेऊन कारवाई करते मग आजपर्यंत मनपाने किती राजकीय पक्षांच्या अनधिकृत कार्यलयांची दखल घेऊन त्यापैकी कितींना नोटीसा पाठवल्यात? राजकीय पक्षांच्या अनधिकृत कार्यालयावर कारवाई करण्यासाठी मनपावर काही दबाव तर येत नाही ना?

# 'ग्रो मोअर फूड्स'ला ठेकेदारांकडून हरताळ: दूषित पाण्यावर पिकतोय भाज्यांचा मळा

**नवी मुंबई-** मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळालगतच्या मोकळ्या जागा पालेभाज्यांची लागवड करण्यासाठी केंद्र सरकारच्या ग्रो मोअर फूड्स योजनेअंतर्गत ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत. मात्र या ठेकेदारांच्या माध्यमातून भाजी लागवडीसाठी गटारांतील दूषित पाणी वापरले जात असल्याचे दिसून आले आहे. नवी मुंबईत सुद्धा हा प्रकार सर्रासपणे सुरू असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

रेल्वे प्रशासनाने ग्रो मोअर फूड्स योजनेअंतर्गत नवी मुंबईतील बेलापूर ते वाशी आणि जुईनगर ते ठाणे दरम्यानच्या रेल्वेमार्गालगतच्या मोकळ्या जागा पालेभाज्यांची लागवड करण्यासाठी ठेकेदारांना भाडेतत्त्वावर दिल्या आहेत. या मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणात पालेभाज्या पिकविल्या जातात. या भाज्या शहरात अगदी स्वस्तात विकल्या जातात. विशेष म्हणजे या भाज्या पिकविण्यासाठी अत्यंत दूषित पाणी वापरले जात असल्याचे दिसून आले आहे.

अनेक ठिकाणी मोठ्या नाल्यातील पाणी मोटरपंपच्या साहाय्याने या भाजीच्या मळ्याला पुरविले जाते. तर तुर्भे ते ऐरोली दरम्यानच्या रेल्वेमार्गालगत पालेभाज्यांच्या लागवडीसाठी रसायन मिश्रित दूषित पाण्याचा वापर केला जात असल्याचे दिसून आले आहे. एमआयडीसीतील अनेक कंपन्या रसायनमिश्रित पाणी प्रक्रिया न करताच लहान-मोठ्या नाल्यातून खाडीत सोडतात. या नाल्यातील दूषित पाणी भाजीचे मळे पिकविण्यासाठी वापरले जात आहे. अनेक ठिकाणी नाल्यातील पाणी खेचण्यासाठी



डिझेलवर चालणारे पंप बसविण्यात आले आहेत. तर कोपरी येथील रेल्वेरुळालगतच्या शेतीसाठी बोअरवेल खोदण्यात आली आहे. दूषित पाण्यावर पालक, मुळा, मेथी आदी पालेभाज्या पिकविल्या जातात.

या भाज्या शहरातील किरकोळ विक्रेते, हॉटेल्स चालकांना थेट पुरविल्या जातात. शेजारच्या एपीएमसीमधील घाऊक मार्केटपेक्षा या भाज्या ताज्या व स्वस्त असल्याने अनेक किरकोळ विक्रेते सकाळी थेट रेल्वमार्गावर येवून भाजी खरेदी करतात. या भाज्यांची विक्री प्रामुख्याने रेल्वे स्थानकाबाहेर, लोकलमध्ये, शहरातील दैनंदिन बाजार, पदपथावरील फेरीवाल्यांकडून केली जाते.

# प्लॅस्टिकचा २५ टन साठा जप्त: महापालिकेची दोन महिन्यांतील कारवाई

**नवी मुंबई-** प्लॅस्टिकमुक्त नवी मुंबईची संकल्पना साकारण्यासाठी शहरात प्लॅस्टिक वापरावर बंदी घालण्यात आली आहे. प्लॅस्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांवर महापालिकेच्या माध्यमातून कारवाईचा बडगा सुरू असून गेल्या दोन महिन्यात २५ टन प्लॅस्टिक जप्त व १५ लाखांची दंड वसुली करण्यात आली आहे.



शहरात प्लॅस्टिक बंदी राबविण्यासाठी तसेच प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर रोखण्यासाठी होळी सणापासून मोहिमा तीव्र करण्यात आल्या आहेत. याअनुषंगाने प्लॅस्टिकच्या किरकोळ विक्र ेिवर प्रतिबंध आणण्यासोबतच त्यांच्या साठ्यांवरही मोठ्या प्रमाणात धाडी घालून धडक कारवाया करण्यात आल्या आहेत. सोमवारी १३ मे रोजी करावेगाव येथे प्लॅस्टिक वापरणाङ्खया व्यावसायिकावर कारवाई करीत त्यांच्याकडून ३० किलो प्लॅस्टिक व ५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

मार्च व एप्रिल या दोन महिन्यांत प्लॅस्टिक कारवायांमध्ये वाढ झाली असून दोन महिन्यांच्या कालखंडात २५ टन ५१२ किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून १५ लाख ४५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

# वसई, विरारमधील नाले सफाई ३० पर्यंत होईल?

**विरार- पालिकेने ३० मे ला नाले सफाईचे काम पूर्ण होण्याची शाश्वती दिली असली तरीही छोट्या नाल्यांची सफाई अद्यापही झालेली नसून त्यातील गाळ व कचरा तसाच आहे. तसेच मोठ्या नाल्यांची सफाई योग्यरित्या होत नसल्यामुळे महापालिकेची नाले सफाई कधी किती व कशी पूर्ण होणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



पावसाळा आला की वसई तालुक्यातील नागरिकांना पाणी भरण्याची चिंता सतावत असते. गेल्यावर्षी सर्व प्रयत्न केल्यानंतर व १०० टक्के नाले सफाई झाली असल्याचा दावा करूनही नागरिकांना पूरस्थितीचा सामना करावा लागला होता तर यावर्षी ते होऊ नये यासाठी पालिकेने जमेल तितके प्रयत्न सुरु केले आहेत. असा दावा महापालिकेकडून होत आहे. पूरस्थिती निर्माण होण्याचे सर्वात मोठे कारण हे नाले सफाई न होणे हे असल्याने मार्चमध्ये नाले सफाईला सुरवात झाली असून आतापर्यंत ७० टक्के काम पूर्ण झाले आहे असे महापालिकेचे म्हणणे आहे. गेल्या वर्षी पालिकेने ४.५ करोड नाले सफाई वर खर्च केला होता यावर्षीही तितकाच खर्च नालेसफाईकरिता करण्यात येणार आहे. तर मोठ्या मोठ्या नाल्यांची सफाई पूर्ण झालेली आहे असा दावा महापालिकेचा आहे. परंतु शहरातील अनेक भागात असलेली छोटी गटारे व नाले यांची सफाई अद्यापही झालेली नाही. तसेच ज्या नाल्यांची सफाई करण्यात आली आहे त्यांचा गाळ काढून बाहेरच ठेवल्यामुळे तो पुन्हा नाल्यात पडल्याने पावसात नाले पुन्हा तुंबण्याची शक्यता वाढली आहे. गेल्या वर्षी सर्वत्र नाले सफाई करून देखील नागरिकांना अतिवृष्टीचा सामना करावा लागला होता तर माजी आयुक्त सतीश लोखंडे यांनी जागो जागी जाऊन स्वत: नाल्यांची पाहणी केली होती.

# डहाणूतील सायवन भागात पाणीबाणी; विहिरी, नद्या आटल्या

**कासा-** डहाणू तालुक्यातील सायवन भागातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे संकट गडद होत आहे. टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करावा म्हणून हवालदिल झालेल्या जनतेने स्थानिक प्रशासनाला निवेदने देऊनही दुर्लक्ष होत आहे. पोकळ आश्वासनांची खैरात मांडणारे लोकप्रतिनिधी पाणीसमस्ये कडे लक्ष देत नाहीत. पाणीपुरवठा प्रश्न न सोडविणारे प्रशासन केवळ निवेदने फक्त स्विकारते का? असा संतापजनक प्रश्न उपस्थित केला जात आहे. सायवन, दाभाडी किन्हवली, सुकटआंबा, दिवशी, शिसने, ओसरविरा, धानिवरी या आदिवासी भागातील ग्रामपंचायतीच्या हद्दीत अनेक गावपाड्यांत यावर्षी जलसंकट उभे ठाकले आहे. सायवन ग्रामपंचायतिच्या आजूबाजूच्या सुमारे २० गावपाड्यात हे संकट अधिकच तीव्र झाले आहे. त्याचा फटका सुमारे साडेपाच हजार लोकवस्तीला बसणार आहे. दाभाडीमधील भावरपडा, फणसोन पाडा, बोरीपाडा, धुळशेत पाडा येथे पाणीटंचाई आहे त्यापैकी भावरपाडा गावातील सुमारे ४५० लोकवस्ती असलेल्या



पाड्यातील लोकांना नदीपात्रात खड्डे खोदून पाणी भरावे लागत आहे . सुकट आंबा गावातील बरडीपाडा, पाटीलपाडा, जुणूनपाडा, शिरशेनपाडा तर दिवशीगावातील चामलपाडा, गडदपाडा, चिंचपडा येथील पाड्यामधील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यावर्षी पाणी पातळी दीड महिने अगोदरच खालावल्याने लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून नदी पात्रात लहानसा पोहरा खोदून लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. दूरवरून पाणी आणताना माता भगिनींना दररोज बहुतेक वेळ पाण्यासाठी खर्च करावा लागतो. त्यामुळे कित्येक महिलांना रोजगार बुडवून पाण्यासाठी भटकंती करण्याची कसरत करावी लागते.

### ग्रामीण भागात ५०० लीटर पाणी साडेतीनशे रुपयांत

तलावांचा जिल्हा असूनही पाणीटंचाईच्या झळा तीव्र झाल्या आहेत. पाण्याची गरज भागवण्यासाठी जिल्ह्यातील गावपाडे पाण्याच्या शोधात हिंडत आहेत. यापैकी शहापूर व मुरबाड तालुक्यांमधील ८४ हजार १३३ ग्रामस्थ पाणीटंचाईने त्रस्त आहेत. त्यांना ३६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याचा दावा होत आहे. मात्र भिवंडी, कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यांतील शेकडो गावपाडे टंचाईला तोंड देत आहेत. त्यांची प्रशासनाने अजूनही दखल घेतलेली नाही. यामुळे तेथे अद्यापही टँकरद्वारे पाणीपुरवठा होत नसल्याचे आढळून आले. यामुळे तेथील जनतेवर साडेतीनशे रुपयांत ५०० लीटर पाणी विकत घेण्याची पाळी आली आहे.

# आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्या वतीने चेंबूर, एम पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये आरोग्य शिबीर संपन्न















**(पान १ वरुन)** या कार्यक्रमाचे वैशिष्ठ म्हणजे संयुक्त जयंती उत्सवात अवयवदाना विषयी जागृती व अंधश्रद्धा निर्मुलन वरील विविध प्रकरचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सन २०१८ ते २०१९ वर्षामधील उल्लेखनीय विषेश १०वी , १२वी , पदवीधर परिक्षा उत्तीर्ण व विशेष पदवी संपादन करणाऱ्या कर्म चारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच गौरव केलेल्या संपूर्ण दृष्टीहीन स्वरधारा वादयवृंद हा गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अतिशय सुरेल आवाज , मंत्रमुग्ध करणारे स्वर व महापुरुषांची महती काव्यरुपाने गाणारे दृष्टीहीन कलाकार यांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

संयुक्त जयंती महोत्सव या कार्यक्रमाचे आयोजक उत्सव समिती चंद्रपाल गमरे , अशोक चव्हाण , महेश पेडणेकर , जितेंद्र जगताप , विजय तळेकर , व समस्त महानगरपालिका कर्मचारी वर्गाने अहोरात्र श्रम घेऊ न मोठया संख्येने कार्यक्रम पार पाडला. उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांसाठी भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

# केंद्रात पुन्हा आमचेच बहुमतातील सरकार

## पहिल्या पत्रकार परिषदेत मोदींचा दावा



**नवी दिल्ली- पूर्ण बहुमत मिळालेले सरकार सलग दुसऱ्यांदा केंद्रात सत्तेवर येईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यातील प्रचार संपल्यानंतर, मोदी यांनी भाजपच्या मुख्यालयात पाच वर्षांत पहिल्यांदाच पत्रकार परिषद घेतली. या वार्तालापात मोदींनी एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नाही, पण भाजपप्रणीत एनडीए आघाडीचे सरकार पुन्हा केंद्रात स्थापन होईल, असा दावा केला.**

केंद्रात पाच वर्षे पूर्ण बहुमत असलेले सरकार चालवले जाते, तेच सरकार पूर्ण बहुमत मिळवून पुन्हा सत्तेत येते असे दीर्घकाळ पाहायला मिळालेले नाही. सत्तेवर आलेल्या काही सरकारांना पुन्हा सत्ता मिळाली नाही. काही सरकारे वर्ष-दीड वर्षे टिकली. काही सरकारांना पुन्हा सत्ता स्थापन करण्याची संधी जरूर मिळाली, पण घराण्याच्या आशीर्वादाने ती सत्तेत राहिली, असे सांगत मोदींनी गांधी कुटुंबावर अप्रत्यक्ष टीका केली. २०१९ची लोकसभा निवडणूक 'शानदार' झाली. पूर्ण बहुमतातील सरकारला लोकांनी पाठिंबा दिला. मतदारांना धन्यवाद देण्यासाठी मी प्रचारात उतरलो होतो. यंदाचा प्रचार म्हणजे माझ्यासाठी 'धन्यवाद मोहीम' होती, असे मोदी म्हणाले. भाजपच्या संकल्पपत्रात विकासकामांचा उल्लेख केलेला आहे. त्यातील प्रत्येक काम देशातील अखेरच्या लाभार्थीपर्यंत पोहोचवण्याचे भाजपचे लक्ष्य असेल. निकालानंतर सत्ता स्थापन होताच विकास कामे पुन्हा सलग सुरू होतील, असेही मोदी यांनी सांगितले. पाच वर्षांपूर्वी लोकसभेच्या निवडणुकांमुळे आयपीएलचे सामने देशाबाहेर घ्यावे लागले होते पण, यावेळी देशात आयपीएलचे सामने खेळले गेले, रमझान, परीक्षा झाली आणि लोकसभा निवडणुकीचा प्रचारही झाला.

# पश्चिम घाटमाथ्यावरील वृक्षतोडीमुळे पाऊस रुसतोय

**कोल्हापूर-** भारताचे समाजजीवन हे मान्सूनवर अवलंबून आहे. मान्सून पाऊस हा आपल्याकडे जुगार मानला जातो. आला तर आपला नाही तर दुष्काळ, असे मान्सेनचे वर्णन पर्यावरण अभ्यासकांनी करून ठेवले आहे. परंतु अलीकडे मान्सून कमी पडत असल्याची वस्तुस्थिती आहे. यंदा वळीव आणि मान्सूनपूर्व पाऊस अद्याप बरसलेलाच नाही. या निसर्गाच्या असमतोलाला पश्चिम घाटमाथ्यावर सुरू असलेली प्रचंड वृक्षतोड कारणीभूत असल्याचे मत पर्यावरण अभ्यासकांकडून व्यक्त करण्यात आले.

उन्हाळा संपत आला आहे. अख्ख्या देशाला मान्सूनचे वेध लागले आहेत; पण यंदा पाऊस कमी पडणार, असा हवामान खात्याकडून अंदाज वर्तविण्यात आला आहे. गतसालीही महाराष्ट्रासह देशभर पाऊस कमी बरसला होता. परिणामी सध्या बहुतेक ठिकाणी तीव्र पाणी टंचाई सुरु झाली आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेशसह सोलापूर, सांगली, सातारा आदी महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये दुष्काळ पडला आहे. माणसांना पाणी मिळत नाही. जनावरांसाठी छावण्या निर्माण करण्यात आल्या आहेत. एकूणच दुष्काळाची भीषण परिस्थिती दिसू लागली आहे. कोल्हापूरसारख्या पाऊसपाण्यासाठी संपन्न जिल्ह्यांत यंदा



वळीव पडलेला नाही. वळीव पडला नसल्याने पाणीटंचाईची तीव्रता अनेक भागांत दिसत आहे. एकूणच 'पाणीबाणी' सर्वत्रच सुरु झाली आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब विचार करून वापरला नाहीतर भावी पिढ्यांमध्ये पाण्यावरुन रक्तपात होईल, अशी भाकिते मान्यताप्राप्त जलसंधारणाचे काम करणाऱ्या संस्था व्यक्त करत आहेत. वॉटर कप या पाणी संवर्धन करणाऱ्या स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील भांडवली हे गाव प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले होते. त्या गावात आज पाणी टंचाईमुळे टँकरने पाणीपूरवठा करावा लागत आहे. याचा अर्थ पाणी संवर्धन करण्यात ही गावे प्रचंड मेहनत घेत असताना पाऊसच अत्यंत कमी पडला असल्याची वस्तुस्थिती नाकारता येणारी नाही.

# लोकसभा निवडणुकीच्या निकालावरच शिवसेनेचे उपमुख्यमंत्रिपद अवलंबून

**मुंबई-** लोकसभा निवडणुकीत युती करण्याचा भाजपचा प्रस्ताव मान्य करणाऱ्या शिवसेनेला उपमुख्यमंत्रिपदाप्रमाणेच राज्यात सत्तेतील वाटा वाढवून पाहिजे आहे. मात्र शिवसेनेची इच्छापूर्ती लोकसभा निवडणुकीच्या निकालावरच अबलंबून राहणार आहे.




भाजप आणि शिवसेनेत कमालीची कटुता निर्माण झाली असतानाही भाजपने मैत्रीसाठी पुढे केलेला हात शिवसेनेने स्वीकारला. कोणतीही कुरबुर न करता शिवसेनेने युती केली. युती करताना लोकसभेसाठी शिवसेनेला एक जागा वाढवून देण्यात आली. तसेच विधानसभा निवडणुकीत मित्र पक्ष वगळता उर्वरित मतदारसंघ निम्मे वाटून घेण्याचा करार झाला आहे. तसे भाजप अध्यक्ष अमित शहा आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आले होते.

राज्याच्या सत्तेत शिवसेनेला उपमुख्यमंत्रिपद किंवा महत्त्वाचे खाते हवे आहे. लोकसभा निकालानंतर लगेचच विस्तार केल्यास नव्या मंत्र्यांना तीन महिन्यांचा कालावधी मिळेल, असे गणित आहे. पण भाजपकडून मात्र सावध पावले टाकली जात आहेत. २३ तारखेला लागणारा निकाल बघूनच निर्णय घेतला जाईल, असे संकेत भाजपच्या उच्चपदस्थांकडून देण्यात आले. शिवसेनेची उपमुख्यमंत्रिपद किंवा महत्त्वाच्या खात्याची मागणी असली तरी ही मागणी मान्य करायची की नाही हे सारे निकालावर अवलंबून असेल.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपलाही मंत्रिमंडळात काही नवे चेहरे समाविष्ट करायचे आहेत. अन्न व नागरी पुरवठा आणि संसदीय कार्यमंत्री गिरीश बापट हे लोकसभेत निवडून गेल्यास ही जागा भरावी लागेल. तसेच कृषी खात्याचा अतिरिक्त कार्यभार महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे आहे. विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांचा मंत्रिमंडळात समावेश करायचा झाल्यास त्यांना एखादे महत्त्वाचे खाते द्यावे लागेल. यामुळे लोकसभा निकालावरच सारी समीकरणे अवलंबून असल्याचे भाजपच्या गोटातून सांगण्यात आले.

# धरणांतील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर; महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सल्ला जारी

**नवी दिल्ली-** धरणांतील पाणीपातळीत चिंताजनक घट झाल्याने केंद्र सरकारने महाराष्ट्रासह सहा राज्यांना पाण्याचा वापर विवेकाने करण्याचा सल्ला जारी करण्यात आला आहे. शुक्रवारी तामिळनाडूसाठी सल्ला जारी करण्यात आला असून, याच प्रकारे



महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाला मागच्या आठवड्यात इशारावजा सल्लापत्र जारी करण्यात आले, असे केंद्रीय जल आयोगाचे (सीडब्ल्यूसी) सदस्य एस.के. हलदर यांनी सांगितले.

गेल्या दहा वर्षांतील जिवंत साठ्याची सरासरी आकडेवारीपेक्षा जलशयांतील पाणीपातळी २० टक्क्यांवर आल्याने केंद्र सरकारकडून उपरोक्त राज्यांना दुष्काळाबाबत इशारावजा सल्ला जारी करण्यात आला. घटत्या पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर जोवर पाणीपातळीत वाढ होत नाही, तोवर धरणांत उपलब्ध पाण्याचा पिण्यासाठीच वापर करावा, असा सल्ला या राज्यांना देण्यात आला आहे. देशभरातील मोठ्या ९१ जलशयांतील उपलब्ध पाणीसाठ्याचे केंद्रीय जल आयोगाकडून आकलन केले जाते. केंद्रीय आयोगाने गुरुवारी जारी केलेल्या पाणीसाठा आकडेवारीनुसार आजघडीला ३५.९९ अब्ज घन मीटर पाणीसाठा आहे. या जलशयांच्या एकूण पाणी साठवण क्षमतेपेक्षा हे प्रमाण २२ टक्के आहे.

# मायावतींनी लग्न करावं, म्हणजे कुटुंब काय असतं त्यांना समजेल -आठवले

**मुंबई-** मायावती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत वक्तव्य करत आहेत. मात्र मायावतींनी लग्न केले नाही त्यामुळे कुटुंब काय असते त्यांना ठाऊक नाही. त्यांनी लग्न करावे मग त्यांना घर, कुटुंब कसे सांभाळले जाते याची जाणीव होईल असं रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. मायावती यांनी लग्न केले तर त्या मोदींबाबत बोलू शकतात असंही आठवले यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशातील भेलुपूर या ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही टीका केली.



राजकीय फायद्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वतःच्या पत्नीला सोडलं, ते महिलांचा सन्मान कसा करणार? असा प्रश्न विचारत मायावतींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली होती. याच टीकेला रामदास आठवले यांनी उत्तर दिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं लग्न झालं आहे.

# आरक्षणामुळे खासगी कॉलेजात प्रवेश घेतल्यास फी सरकार भरणार; वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी मराठा आरक्षण कायम

**मुंबई-** नागपूर खंडपीठ व सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेशासाठी १६ टक्के मराठा (एसईबीसी) आरक्षण नाकारल्यानंतर अडचणीत आलेल्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना राज्य सरकारने शुक्रवारी दिलासा दिला. चालू शैक्षणिक वर्षात मराठा आरक्षणानुसार या अभ्यासक्रमासाठी घेतलेले प्रवेश कायम राहतील, असा अध्यादेश सरकारने काढून तो राज्यपालांकडे पाठवला आहे. राज्यपालांची मंजुरी मिळताच हे प्रवेश संरक्षित होतील. दुसरीकडे, या १६ % आरक्षित प्रवेशांमुळे खुल्या




वर्गातील ज्या विद्यार्थ्यांना खासगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला किंवा लागेल, त्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णयही सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. या निर्णयातून अध्यादेशाविरोधात न्यायालयात जाण्याच्या तयारीत असलेल्या विद्यार्थ्यांचा रोष कमी करण्याचा प्रयत्नही सरकारने केला आहे. हा निर्णय फक्त चालू शैक्षणिक वर्षापुरताच मर्यादित असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशात मराठा आरक्षणावरून निर्माण झालेला तिढा सोडवावा या मागणीसाठी मराठा विद्यार्थ्यांनी गेले १० ते १२ दिवस मुंबईत आंदोलन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन यातून मार्ग काढण्याची मागणीही केली. राज्य सरकारनेही या मागणीची गांभीर्याने दखल घेत यातून मार्ग काढणार असल्याचे आश्वासन दिले होते. मात्र आचारसंहिता असल्यामुळे याबाबतचा अध्यादेश काढण्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगी आवश्यक होती.

# बुलडाणा जिल्ह्यात रेती तस्करीचे रॅकेट सक्रीय

**नांदुरा :** बुलडाणा जिल्ह्यात पकडण्यात आलेल्या रेती घाटांचे लिलाव सुरू आहेत. रेती साठ्यामागे रेती तस्करीचे रॅकेट सक्रीय असून नदीपात्रातून दिवसा एका रॉयल्टीमागे दररोज अनेक गाड्या भरून जात असल्याने शासनाचा करोडो रूपयाच्या महसूल बुडत आहे. यात तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय महसुल अधिकारी रेती तस्करांना सहकार्य करीत असल्याचे बोलले



जाते. रेती परवाना घेतल्यानंतर एका रॉयल्टीवर सकाळी ५ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत मुदत असते. एकच रॉ यल्टी दिवसभर रेती वाहतुकीसाठी वापरण्यात येते. एका रॉयल्टीवर ४ ते ५ रेतीच्या ट्रिप मारल्या जातात. एक ब्रास रेतीच्या परवान्यावर १५ ते २० ब्रास रेतीची वाहतूक करण्यात येते. २०० ब्रास रेती हर्रासीत घेतल्यानंतर नदीपात्रातून ८०० ते १ हजार ब्रास रेती उचलली जाते. हे सर्व महसुल प्रशासनाला माहित असूनही सर्व काही बिनदिक्कतपणे सुरू आहे. यात लाखो रूपयांची कमाई होत असल्याची चर्चा आहे. यात महसुल अधिकाड्यांचाही सहभाग आहे.


आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)